शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्रं.१७/२०२२**

श्री.प्रमोद दिगंबर चौगुले
प्लॅट न.२०१,समर्थ अपार्टमेंट,
हरिमंदीर रोड, दुधाळी,कोल्हापूर. } तक्रारदार

विरूध्द्

१. डॉ.डी.वाय.पाटील प्रतिष्ठान,
अजिंक्यतारा,१२१६ ए, ताराबाई पार्क, कोल्हापूर.
२. डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड
टेक्नॉलॉजी, कसबा बावडा, कोल्हापूर. } वि.प.

डॉ.डी.वाय.पाटील प्रतिष्ठान, ताराबाई पार्क, कोल्हापूर यांचे डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, कसबा बावडा, कोल्हापूर येथील शिक्षक श्री.प्रमोद दिगंबर चौगुले यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.३१/०५/२०२२ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

१. सहयोगी प्राध्यापक या पदाला देय असलेल्या वेतन श्रेणीनुसार वेतन त्वरीत लागू करून मला दि.०१/११/२०१२ पासून आजपर्यंत या कालावधीमधील वेतनामधील फरक योग्य त्या व्याजासहित मिळावा.

२. मला झालेल्या मानसिक त्रासाबद्दल रूपये वीस लाख रूपयांची नुकसान भरपाई मिळावी. माझी आर्थिक प्रगती थांबल्यामुळे मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी बँकाकडून मला कर्ज स्वरूपात रक्कम घेवून त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी पार पाडावी लागत आहे.

३. संस्थेकडे देय असलेल्या रक्कमा व मला ज्या दिवशी देय होत्या त्या दिवसापासून भविष्यकाळात संस्था देईल त्या कालावधीपर्यंत व्याजासहीत मिळाव्यात.

४. भविष्य काळामध्ये मला कोणत्याही प्रकारचा मानसिक त्रास संस्थेकडून दिला जाणार नाही याची कायदेशीर लेखी ग्वाही संस्थेकडून घेण्यात यावी व या नियमांचा भंग केल्यास विद्यापीठाने संस्थेवर कायदेशीर कारवाई करण्यास पुढाकार घ्यावा.

तसेच तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये आपणास सेवापुस्तकाची दुय्यम प्रत दिली जात नाही, सेवापुस्तकाची झेरॉक्स मागीतली असता दिली जात नाही, सॅलरी स्लिप दिली जात नाही अथवा विलंबाने

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

दिली जाते, कधीही न शिकवलेला विषय शिकवण्याकरीता दबाव आणला जातो, महाविद्यालयाच्या कामाकरीता विभागप्रमुखांची परवानगी घेवून कॉलेजबाहेर गेलो असता कारणे दाखवा नोटीस दिली जाते इत्यादी तक्रारी नमूद केल्या आहेत.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१.गॅझेट ऑफ इंडिया क्रं. CGDLCA-010622020-219672 दि.२० मे २०२० मधील तरतूदीनुसार ०५ मार्च २०१० पुर्वी Ph.D अर्हता धारण करणा-या शिक्षक कर्मचा-यास ९००० ग्रेड वेतन अदा करता येते. त्यास अनुसरून श्री.पी.डी.चौगुले यांनी २०१८ मध्ये Ph.D अर्हता धारण केलेनंतर त्यांचे वेतनामध्ये तीन वेतनवाढी लागू केल्या आहेत.

२.विद्यार्थी उपलब्ध नसलेने महाविद्यालयाने उत्पादन अभियांत्रिकी अभ्यासक्रम बंद केलेला आहे. यांत्रिक अभियांत्रिकीमध्ये सहयोगी प्राध्यापक पदाकरीता जाहिरात प्रसिध्द् झालेनंतर सदर कर्मचारी अर्ज करू शकतात.

३.तक्रारीमधील इतर मागण्यासंदर्भात काही मुद्यांवर मा.उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित आहे. सदर मुद्यांवरील संदर्भिय माहिती आम्ही समिती समोर सादर करू.

**समितीची निरिक्षणे :**

<u>१.</u> तक्रारदार यांनी सदर संस्थेच्या महाविद्यालयात सन १९९९ मध्ये आपण व्याख्याता या पदावर रूजू झालो. तसेच सन २००५ मध्ये सिनिअर स्केल व सन २००९ मध्ये सिलेक्शन ग्रेड या वेतनश्रेणी मिळणेस पात्र होतो. तथापि महाविद्यालयाकडून सदरचे लाभ आपणास देण्यात आलेले नाहीत. तसेच सन २०१० मध्ये सहाव्या वेतन आयोगाची स्थाननिश्चिती करताना सिनिअर स्केल व सिलेक्शन ग्रेड च्या वेतनश्रेणी विचारात न घेता आपली वेतननिश्चिती करण्यात आली आहे अशी तक्रार नमूद केली आहे.

या तक्रारीबाबत संस्था, महाविद्यालयाने दिलेल्या दि.२२ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या लेखी म्हणण्यामध्ये तक्रारदार श्री.चौगुले यांची महाविद्यालयात रूजू होताना B.E. Production engg. अशी शैक्षणिक अर्हता होती. AICTE, New Delhi यांनी दि.०३/०५/२००० रोजी सर्व राज्याच्या technical education च्या सचिवांना पत्र पाठवून Revision of pay scale and service condition of teacher, librarians and physical education person of private self finance degree level thchnical institutions यांच्याबदद्ल पत्रव्यवहार केला. त्या नोटीफिकिशेन मधील मुद्या क्रं. ७ मध्ये career advancement scheme बाबत विस्तृत माहिती देण्यात आली आहे. त्या नोटीफिकिशेनमधील मुद्या क्रं. ७ अ प्रमाणे lecturer मधून lecturer in senior scale होण्याकरीता

शिवाजी तक्र निवा समि कोल्हा

पुढील अटींचे मार्गदर्शन करण्यात आले आहे. 4 years for Ph.D holders, 5 years for M. Phil/ME/M.Tech. Degree holder, 6 years for other

तसेच Senior scale मधून selection Grade ला जाणेकरीता Minimum length of Service as Lecturer in Senior Scale shall be uniformly 5 years.

तसेच AICTE, New Delhi यांचेकडून दि.१०/०९/२००३ रोजी Clarification on certain issues pertaining for pay scale for degree and diploma level technical institution जारी करण्यात आले. या नोटीफिकिशेन च्या मुद्या क्रं.३७ मध्ये Degree level technical institution च्या प्राध्यापकांना Relaxation in qualification बद्‌दल माहिती देण्यात आली त्या निर्णयानुसार सदरची अट मुद्या क्रं.१० मध्ये तशीच ठेवण्यात आली. या मुद्या क्रं.१० प्रमाण Existing Reruitment Rules ही फक्त ज्या प्राध्यापकांची नेमणूक १/१/१९९६ च्या आधी झालेली आहे. त्यांना लागू होईल. आणि त्या नंतर नोकरीत लागलेल्या प्राध्यापकांना CAS साठीचे AICTE चे Rules and regu. लागू होतील असे नमूद करण्यात आले आहे. या नोटीफिकिशेन च्या Appendix-1 मधील 1.1 General प्रमाणे दि. ०३/०५/२००० रोजीच्या AICTE च्या नोटीफिकिशेन नुसार length of Service as Lecturer in Senior Scale and Selection Grade साठी तेच ठेवण्यात आले आहे.

AICTE च्या दि.०५/०३/२०१० रोजीच्या pay Scale service condition and qualification for degree level technical instituition regulation 2010 हे प्रसिध्द करण्यात आले आहे. या नोटीफिकिशेनच्या पार्ट A प्रमाणे Asst. Professor/Associate Professor/Professor in technical education मधील मुद्या क्रं. ६ प्रमाणे Lecturer in Senior Scale यांना Asst. Professor re-designate करून Rs. 15600-39100/- with AGP of Rs.7000/- अशा प्रकारचे re-designate करण्यात यावे असे मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

सदर श्री.चौगुले हे १९९९ नोकरीत रूजू झालेनंतर फक्त B.E. असल्याने ६ वर्षाचा कार्यकाल संपवुन दि.०१ नोव्हेंबर २००५ साली Lecturer in Senior Scale साठी पात्र झाले. (कार्यकालाची पात्रता पुर्ण केल्यानंतर एआयसीटीई च्या इतर कॅस च्या अटी व शर्तींच्या पुर्तता करण्याच्या अटीवर). श्री.चौगुले यांच्या मागणीप्रमाणे ते १० वर्षाच्या सेवेनंतर २००९ ला Lecturer in selection grade ची मागणी करतात आणि तसेच Lecturer in selection grade ला ३ वर्षांचा कार्यकाल पुर्ण झालेनंतर २०१२ पासून Associate Professor ची मागणी करतात.

एआयसीटीईच्या च्या दि.०५ मार्च २०१० रोजीच्या नोटीफिकिशेनमधील मुद्या क्रं.(a)-(x) प्रमाणे ज्या शिक्षकांचे दिनांक ०१/०१/२००६ पुर्वी Lecturer in selection grade मध्ये प्रमोशन झालेले आहे. परंतू त्यांचा तीन वर्षाचा कार्यकाल दि.०१/०१/२००६ रोजी संपलेला नाही अशा शिक्षकांचा

जोपर्यंत ते Lecturer in Selection Grade मधील तीन वर्षाचा संपूर्ण कार्यकाल पुर्ण करत नाहीत तो पर्यंत त्यांची रू. 15600-39100/- with AGP of Rs.8000/- मध्ये नेमणूक करण्यात यावी व AGP 9000/- त्यांना तीन वर्षाच्या कार्यकालानंतर देण्यात येईल.

श्री.चौगुले हे दि.०१/०१/२००६ रोजी फक्त Lecturer in Senior Scale साठी पात्र होते आणि एआयसीटीई च्या नोटीफिकिशेननुसार इतर अटींची पुर्तता करून ते selection grade साठी ११ वर्षाच्या कालखंडानंतर पात्र होतील म्हणजे ते दि.०१/११/२०१० रोजी सदर पदासाठी पात्र होतील.

संस्था, महाविद्यालयाने वर नमूद केलेल्या बाबी अवलोकनी घेता तक्रारदार श्री.चौगुले हे सन १९९९ मध्ये नोकरीत रूजू झालेनंतर त्यांची शैक्षणिक अर्हता B.E. अशी होती. त्यामुळे ६ वर्षाचा कार्यकाल संपवुन ते दि.०१ नोव्हेंबर २००५ साली Lecturer in Senior Scale साठी पात्र होतात. तसेच ११ वर्षाच्या कालखंडानंतर म्हणजे दि.०१/११/२०१० रोजी Selection grade साठी पात्र होते असे निदर्शनास येते. तसेच तक्रारदार यांचे म्हणण्यानुसार सहाव्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती करताना त्यांचे Lecturer in Senior Scale व Selection grade या वेतनश्रेणींचा विचार न करताच त्यांची वेतननिश्चिती करण्यात आली आहे. सबब समिती या निष्कर्शाप्रत येते की, तक्रारदार यांची सन २००५ साली Lecturer in Senior Scale व दि.०१/११/२०१० रोजीची Selection grade या वेतनश्रेणी संस्थेने विचारात घेवून त्यांची सहाव्या वेतन आयोगानुसार फेर वेतननिश्चिती करून त्या अनुषंगीक होणा-या फरकाची रक्कम त्यांना अदा करणेची कार्यवाही करणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.

२. तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये सेवापुस्तकाची दुय्यम प्रत जप्त केलेली आहे व सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रत मागणी केली असता ती दिलेली नसल्याचे नमूद केले आहे.

समितीसमोर संस्था, महाविद्यालयाने सदर तक्रारदार यांची बदली पुणे येथील महाविद्यालयात केली असल्याने त्यांचे दुय्यम सेवापुस्तक नोंद करणेकरीता संबधित महाविद्यालयाकडे पाठविणेत आल्याचे कथन केले आहे. कोणत्याही कार्यालयाने शिक्षक/कर्मचा-यांना त्यांच्या सेवापुस्तकाची दुय्यम प्रत देणे नियमानुसार आवश्यक आहे. सबब तक्रारदार यांचे मागणीनुसार संस्थेने त्यांना त्यांच्या सेवापुस्तकाची दुय्यम प्रत अद्ययावत नोंदीसह देण्यात यावी. तसेच तक्रारदार यांचे मागणीनुसार त्यांना सेवापुस्तकाची छायांकित प्रत उपलब्ध करून देण्यात यावी.

३. तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये सॅलरी स्लिप मिळत नसल्याचे तसचे जुन्या पगारपत्रकाची मागणी केली असता हेतू परस्पर न देणे किंवा विलंब लावला जातो अशी तक्रार नमूद केली आहे.

शिक्षक/कर्मचा-यांना त्यांची सॅलरी स्लिप मिळणे आवश्यक आहे. सबब संस्था, महाविद्यालयाने तक्रारदार यांना त्यांच्या वेळोवेळीच्या मागणीनुसार विलंब न लावता सॅलरीची स्लिप द्यावी.

४. तक्रारदार यांनी आपण न शिकवलेला विषय शिकवण्याकरिता दबाव आणला जातो. तसेच महाविद्यालयाच्या कामासाठी विभागप्रमूखांच्या परवानगीने बाहेरगावी गेलो असता कारणे दाखवा नोटीस दिली जाते अशी तक्रार नमूद केली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी कोणतेही सबळ लेखी पुरावे समितीसमोर सादर केलेले नाहीत. सबब या तक्रारींमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे समितीच्या निदर्शनास येते. त्यामुळे या तक्रारीचा समितीस विचार करता येणार नाही.

५. तक्रारीमध्ये मानसिक त्रासाबद्दल रूपये वीस लाख रूपयांची नुकसान भरपाई मिळावी. तसेच सदरच्या रक्कमा संस्थेकडून ज्या दिवशी देय होतील त्या दिवसापर्यंतच्या कालावधीपर्यंत व्याजासहित मिळाव्यात अशी तक्रार नमूद केली आहे.

सदरची तक्रार समितीच्या कार्यकक्षेत येत नसल्याने या तक्रारीचा समितीस विचार करता येणार नाही.

६. तक्रारदार यांनी आपणास भविष्य काळामध्ये मानसिक त्रास दिला जाणार नाही याची लेखी ग्वाही संस्थेकडून घ्यावी तसेच या नियमांचा भंग संस्थेने केल्यास विद्यापीठाने संस्थेवर कायदेशीर कारवाई करण्यास पुढाकार घ्यावा अशी तक्रार नमूद केली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी कोणतेही सबळ लेखी पुरावे समितीसमोर सादर केलेले नाहीत. सबब या तक्रारींमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे समितीच्या निदर्शनास येते. त्यामुळे या तक्रारीचा समितीस विचार करता येणार नाही.

७. तक्रारदार यांची मुख्य मागणी अशी आहे, सहाव्या वेतन आयोगातील तरतूदीनुसार व्याख्याता हे पद समकक्ष झाले असून त्याचे सहा.प्राध्यापक असे नामांकन झाले आहे. आणि त्या तरतूदीनुसार सहा. प्राध्यापक एजीपी ८०००/- मध्ये ३ वर्ष पुर्ण झालेनंतर त्यांचे पदनाम बदलून सहयोगी प्राध्यापक पदाकरीता पात्र ठरतात व त्यांची नेमणूक रू.३७०००-६७००० या वेतनश्रेणीत होते व एजीपी ९०००/- मिळणेस ते पात्र ठरतात. त्यामुळे सहाव्या वेतन आयोगातील तरतूदीनुसार ते सहयोगी प्राध्यापक पदास पात्र ठरतात व एजीपी ९०००/- मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे त्या वेतनश्रेणीनुसार दि.०१/०१/२०१२ पासून वेतनातील फरक योग्य त्या व्याजासह त्यांना देण्यात यावा या त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी दि.२०/०८/२०१८ रोजी एनआयटी या संस्थेमधून पीएचडी ही पदवी प्राप्त केली

असून महाविद्यालयाने त्यांना त्याबाबत तीन वेतनवाढ देय केली आहे. परंतू पात्र असताना देखील आहे त्या श्रेणीमध्ये पे बॅंड १५६००-३९१०० एजीपी ८०००/- मध्ये त्यांना ठेवण्यात आले आहे आणि त्यांना वेतनवाढ देता येत नसलेचे तोंडी कारण देत त्यांना पुढील वेतनवाढ दिलेली नाही.

या संदर्भात संस्था, महाविद्यालयाने दि.२२/११/२०२३ रोजी दिलेल्या लेखी म्हणण्यामध्ये एआयसीटीच्या दि.२०/०५/२०२० रोजीच्या नोटीफिकिशेमधील मुद्या कं.७ प्रमाणे AGP 9000/- साठी दि.०५ मार्च २०१० नंतर कोणीही पात्र होणार नाही असे स्पष्ट Clarification देण्यात आलेले आहे. त्यास अनुसरून महाराष्ट्र शासनाने दि.०३ जून २०२२ रोजीचा शासन निर्णय क्र. MISC1111/28/16/TE-2 मधील Annexure-6 No. 2 अ मधील मुद्या कं.७ प्रमाणे for degree institutions, Ph.D Qualification is mandatory for AGP Rs.9000/-and above w.e.f.10/09/2012 for direct recruitments त्यास अनुसरून प्रा.चौगुले यांनी Ph.D 2018 रोजी प्राप्त केली आहे. म्हणून ते २०१२ रोजी Associate Professor पदासाठी पात्र नाहीत असे नमूद केले आहे.

दोन्ही पक्षकारांनी समितीसमोर सादर केलेले म्हणणे अवलोकनी घेता एआयसीटीईच्या दि.२०/०५/२०२० रोजीच्या नोटीफिकिशनास अनुसरून महाराष्ट्र शासनाने दि.३०/०६/२०२२ रोजीचा शासन निर्णय काढला असून कॅस (CAS) करणेकरीता आणि दि.१०/०९/२०१२ पासून थेट नेमणूकी करीता देखील Ph.D ही शैक्षणिक अर्हता अनिवार्य केली आहे. तक्रारदार यांनी सहयोगी प्राध्यापक पदाकरीता आवश्यक सेवेचा कालावधी जरी पुर्ण केला असला तरी त्याकरीता नियमानुसार आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता त्या कालावधीत पुर्ण केलेली नव्हती. त्यांनी Ph.D ही शैक्षणिक अर्हता २०१८ साली प्राप्त केली असल्याने ते २०१२ साली सहयोगी प्राध्यापक पदाकरीता पात्र नव्हते आणि त्यामुळे त्यांना सहयोगी प्राध्यापकाचे लाभ आणि एजीपी ९०००/- चे लाभ देय ठरत नसल्याचे समितीच्या निदर्शनास येते.

तक्रारदारातर्फे मा.उच्च न्यायालयमधील दि.०३/०२/२०२० तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई रि.पी.६००१/२०१३ मध्ये दि.१०/०२/२०१५ मधील निर्णयाचा आणि मा.स.न्या.एसएलपी नं. १३/२०१७ च्या दि.२२/११/२०१९ निकालाची प्रत हजर केल्या आहेत. त्याचे अवलोकन केले असता एजीपी ९०००/- यास पात्र होणेकरीता इतर शैक्षणिक अर्हता पुर्ण असणे अनिवार्य आहे. तक्रारदार यांनी सहयोगी प्राध्यापक पदास अनिवार्य शैक्षणिक अर्हता ही सन २०१८ साली प्राप्त केली असल्याने ते सहयोगी प्राध्यापक या पदाकरीता सन २०१२ साली पात्र ठरत नव्हते व त्यामुळे तद्अनुषंगिक लाभ त्यांना मागता येणार नाहीत असे या समितीचे मत आहे. त्यामुळे तक्रारदार यांची सदरची मागणी समितीस मान्य करता येणार नाही.

सबब ही समिती खालील मर्यादीत आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

तक्रार अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

१. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांची सन २००५ साली Lecturer in Senior Scale व दि.०१/११/२०१० रोजीची Selection grade या वेतनश्रेणी विचारात घेवून त्यांची सहाव्या वेतन आयोगानुसार फेर वेतननिश्चिती करून त्या अनुषंगीक होणा-या फरकाची रक्कम त्यांना अदा करणेची कार्यवाही तीन महिन्याच्या आत करावी.

२. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांचे मागणीनुसार त्यांना त्यांच्या सेवापुस्तकाची दुय्यम प्रत अद्ययावत नोंदीसह देण्यात यावी. तसेच तक्रारदार यांचे मागणीनुसार त्यांना सेवापुस्तकाची छायांकित प्रत उपलब्ध करून देण्यात यावी.

३. संस्था, महाविद्यालयाने तक्रारदार यांना त्यांच्या वेळोवेळीच्या मागणीनुसार विलंब न लावता सॅलरीची स्लिप द्यावी.

४. समितीच्या उपरोक्त निरिक्षणामधील मुद्या क्रं. ४, ५, ६ व ७ या तक्रारदार यांच्या मागण्या अमान्य करण्यात येत आहेत.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना कळविण्यात यावे.

दिनांक : 25 JAN 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(प्रा. डॉ.एस.पी.हंगिरगेकर )

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर )

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.